**'मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी' या पदाची**
दि.१/१/२०१७ रोजीची सर्वसमावेशक पंचवार्षिक
प्राथमिक सेवाजेष्ठतासूची प्रसिध्दीबाबत.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी - ४११०१८.**
**क्र.प्रशा/१२/कावि/ १७१ /२०१७**
**दिनांक : १० / ३ /२०१७**

वाचले क्र.१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २१/१०/२०११
२) अधिकार प्रदान आदेश क्र. प्रशा/१/कावि/११७५/२०१३ दि. २९/८/२०१३
३) आदेश क्र. प्रशा/१२/कावि/४८७/२०१६ दि.२४/५/२०१६ अन्वये दि.३१/१२/२०१५ अखेरची **'मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी'** पदाची अंतिम सेवाजेष्ठतासूची
४) मा.आयुक्त सो. यांचेकडील परिपत्रक क्र.प्रशा/७/कावि/६५/१२ दि. १९/१/२०१२
५) मा.आयुक्त सो. यांचेकडील परिपत्रक क्र.प्रशा/७/कावि/६३५/१३ दि. ३१/५/२०१३
६) प्रशासन विभागाकडील दि. ८ / ३ /२०१७ चा मान्य प्रस्ताव

## आदेश

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २१/१०/२०११ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर **'मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी'** पदाची दि.३१/१२/२०१५ अखेरचीं अंतिम सेवाजेष्ठतासूची वाचले क्र.३ अन्वये प्रसिध्द करणेत आली होती. सदरची दि.३१/१२/२०१५ अखेरची अंतिम केलेली सेवाजेष्ठता व त्यानंतर दि.१/१/२०१६ ते दि.३१/१२/२०१६ या कालावधीत संबंधित वर्षात नियमित पदोन्नती, सरळसेवा वा अन्य विहित मार्गाने नियुक्त अधिकारी / कर्मचाऱ्यांची एकत्रित **दि.१/१/२०१७** रोजीची सर्वसमावेशक पंचवार्षिक प्राथमिक सेवाजेष्ठतासूची या आदेशान्वये प्रसिध्द करण्यात येत आहे. त्यानुसार ---

१) सर्वसमावेशक पंचवार्षिक प्राथमिक सेवाजेष्ठतासूचीमधील नमुद अधिकाऱ्यांचे नावाबाबत, जात, प्रवर्ग, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता, रुजू तारीख, जेष्ठता क्रम, नियुक्तीचा मार्ग, सेवानिवृत्ती दिनांक अथवा जेष्ठतासूचीमध्ये नांव नसलेबाबत काही आक्षेप असल्यास त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी आपला आक्षेप लेखी निवेदन सादर करून ही तात्पुरती अतिरिक्त प्राथमिक जेष्ठतासूची प्रसिध्द झाल्यापासुन **३० दिवसाचे** आत संबंधित शाखाप्रमुखांमार्फत योग्य त्या पुराव्यासह सादर करावा.
२) आक्षेप मुदतीत सादर न केल्यास किंवा आक्षेपासोबत योग्य ते पुरावे सादर न केल्यास अशा अपुर्ण आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.
३) सर्व शाखाप्रमुखांना कळविण्यात येते की, ही सर्वसमावेशक पंचवार्षिक प्राथमिक सेवाजेष्ठतासूची त्यांनी त्यांच्या विभागातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ बजावुन त्यांना प्रत मिळालेबाबत दिनांकीत स्वाक्षांकित **पोहोच ८ दिवसाचे** आत प्रशासन विभागास सादर करावी. तसेच त्यांनी सदर जेष्ठतासूची त्यांच्या कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्द करावी.
४) संबंधित अधिकाऱ्यांनी सादर केलेले आक्षेप शाखाप्रमुखांनी स्वयंस्पष्ट शिफारसीसह / अभिप्रायासह व कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्यां पुराव्यांची खातरजमा करूनच आवश्यकता असलेस सेवानोंद पुस्तकातील नोंदीसह सर्व पुरावे सत्यप्रती करून मुदतीत प्रशासन विभागाकडे सादर करावे.
५) सर्वसमावेशक पंचवार्षिक प्राथमिक सेवाजेष्ठतासूची प्राप्तच झाली नाही किंवा मुदतीत आक्षेप सादर करूनही शाखाप्रमुखांनी मुदतीत आक्षेप प्रशासन विभागाकडे सादर न केल्यास अंतिम सेवाजेष्ठतासूची प्रसिध्दीनंतर काही वाद निर्माण झाल्यास उक्त संदर्भ क्र.४ अन्वये याबाबतची संपुर्ण जबाबदारी शाखाप्रमुखांची राहील.
६) या सर्वसमावेशक पंचवार्षिक प्राथमिक सेवाजेष्ठतासूचीत काही वास्तविक चुका असल्यास उदा. नाव समाविष्ठ नसणे, आडनावात/आद्याक्षरात/जन्मतारखेत चुका आढळुन आल्यास त्या शाखाप्रमुखांनी निदर्शनास आणाव्यात, म्हणजे जेष्ठतासूची अंतिम करताना त्या दुरूस्त करण्यात येतील.

७) ही सर्वसमावेशक पंचवार्षिक प्राथमिक सेवाजेष्ठतासूची मे.न्यायालयात दाखल केलेल्या अन्य कोणताही विशेष निर्वाणी अर्ज/याचिकेवरील निर्णयामुळे पुर्वीची अथवा या जेष्ठतासुचीत बदल करावा लागेल, त्या निर्णयाच्या अधिन राहुन असेल.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८.

प्रत:- संबंधित विभाग

२/- सदर आदेश व सेवाजेष्ठतासूची मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून सदरची प्रत संबंधित अधिकाऱ्यांचे निदर्शनास आणुन द्यावी. सर्वसमावेशक पंचवार्षिक प्राथमिक सेवाजेष्ठतासूची संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ बजावुन त्यांना प्रत मिळालेबाबत दिनांकीत स्वाक्षांकित **पोहोच ८ दिवसाचे** आत प्रशासन विभागास सादर करावी. सर्वसमावेशक पंचवार्षिक प्राथमिक सेवाजेष्ठतासूची प्राप्तच झाली नाही किंवा मुदतीत आक्षेप सादर करूनही शाखाप्रमुखांनी मुदतीत आक्षेप प्रशासन विभागाकडे सादर न केल्यास अंतिम सेवाजेष्ठतासूची प्रसिध्दीनंतर काही वाद निर्माण झाल्यास उक्त संदर्भ क्र.४ अन्वये याबाबतची संपुर्ण जबाबदारी शाखाप्रमुखांची राहील.

प्र. प्रशासन अधिकारी, (२)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

### मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी पदाची दि.१/०१/२०१७ रोजीची सर्वसमावेशक पंचवार्षिक प्राथमिक सेवाजेष्ठतासूची प्रसिद्धीबाबत.

वेतनश्रेणी :- ९,३००-०-३४,८०० ग्रेड वेतन :- ५,४००

| अ.क्र | संगणक क्र | अधिका-याचे नाव | जात | प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | संगणक अधिकारी रुजु तारीख | नियुक्तीचा मार्ग (पदोन्नत/ सरळसेवा/ मर्यादीत विभागीय परिक्षा) | मनपामध्ये कामास लागलेचे | | सेवानिवृत्ती दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | पद | तारीख | | |
| १ | ३२७ | पोमण निळकंठ धोंडीराम | मराठा | खुला | एच.एस.सी, एम.सी.एम. (एप्रिल २००८ मध्ये उत्तीर्ण), ए.डी.सी.एस.एस.ए., डी.सी.टी., डी.सी.ए., Advanced Post-Graduate Diploma in Urban Management (APGDUM) | १४/०८/१९६७ | ०४/११/१९९५ | सरळसेवा | संगणक अधिकारी | ०४/११/१९९५ | ३१/०८/२०२५ | आदेश क्र..प्रशा/२/कावि/३२३/२०१५ दि.८/०९/२०१५ अन्वये मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी संबोधणेबाबतची तारीख ८/०९/२०१५ |

प्रशासन अधिकारी (२)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.